# महाराष्ट्र शासन
## उच्च शिक्षण संचालनालय
## शिक्षण शुल्क समिती, मुंबई

**(राज्यातील विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)**

**कार्यालयाचा पत्ता- शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,**

**१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१**

Web:www.mahasss.in Tel-022 20824478 E-mail : sssbedmed@gmail.com


क्रमांक-शिशुस/नियमावली/२०२२/ ७२ दिनांक- 28/02/2022

प्रति,
१.प्राचार्य,
राज्यातील विना अनुदानित व कायम विना अनुदानित
शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र(अल्पसंख्यांक महाविद्यालये वगळून) महाविद्यालये
२.प्राचार्य,
भारतीय पुनर्वास परिषद मान्यता प्राप्त सर्व अशासकीय विना अनुदानित
विशेष बी.एड अभ्यासक्रम महाविद्यालये(अल्पसंख्यांक महाविद्यालये वगळून)
महाराष्ट्र राज्य.

विषय - एनसीटीई च्या मार्गदर्शक सुचना व शिक्षण शुल्क समितीच्या नियमावलीतील तरतुदींची अंमलबजावणी करणे बाबत.

संदर्भ - या कार्यालयाचे पत्र क्र.शिशुस/शिक्षण शुल्क समिती/२०२१-२२/२०२२/२८ दिनांक : २१/०१/२०२२

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी, राज्यातील सर्व विनाअनुदानित कायम विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांचे सन २०२१-२२ चे शुल्क शिक्षण शुल्क समितीच्या दिनांक ०५/०१/२०२२ च्या बैठकीत निश्चित करून संदर्भिय पत्राव्दारे कळविण्यात आले आहे.

एनसीटीई च्या दि.१८ जुन २००२ च्या अधिसुचनेतील मार्गदर्शक सुचना तसेच शिक्षण शुल्क समिती ने विहीत केलेल्या नियमावलीमध्ये नमुद केल्यानुसार शिक्षण शुल्क समितीने निश्चित करून दिलेल्या शुल्कापेक्षा जास्तीचे शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून घेण्यात येवू नये. महाविद्यालयांनी जादा शिक्षण शुल्क घेतल्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्यास समितीच्या नियमावलीतील नियम क्र.२.१० प्रमाणे खालील कार्यवाही करण्यात येईल.

१. मंजूर शुल्कात ५०% कपात करणे
२. प्रवेश नियामक प्राधिकरण यांना अशा महाविद्यालयांचे प्रवेश थांबविणे बाबत शिफारस करणे.
३. संबंधित महाविद्यालयाची मान्यता रद्द करण्याबाबत एनसीटीई ला शिफारस करणे.
४. शिक्षण शुल्क समितीने मंजुर केलेल्या शुल्कापेक्षा जादा शुल्क वसूल केलेल्या रक्कमेची वसुली करून शिक्षण शुल्क समितीकडे वर्ग करणे.

त्याचबरोबर एनसीटीई च्या १८ जुन २००२ च्या अधिसुचनेतील ९(३) मध्ये अशा प्रकारे निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा जादा शुल्क घेणाऱ्या तसेच नियमावलीत नमुद केल्या प्रमाणे जमा शुल्काचे लेखे न ठेवल्यास तसेच या नियमावलीचे उल्लंघन झाल्यास अशा महाविद्यालयांची मान्यता रद्द करण्यात येईल, असे नमुद केलेले आहे. याकडेही आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

शिक्षण शुल्क समितीच्या नियमावलीतील २.११ नुसार सर्व महाविद्यालयांनी त्यांच्याकडील उपलब्ध पायाभूत सोयीसुविधा एनसीटीई, आरसीआय, युजीसी, विद्यापिठ ,शासन यांच्या निकषाप्रमाणे महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याच्या सुचना दिल्या आहेत, त्याचे पालन करावे.

महाविद्यालयांनी शिक्षण शुल्क समितीस सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत विद्यार्थी व पालकांना पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केल्यास ती उपलब्ध करून द्यावी तसेच शिक्षण शुल्क समितीने मंजूर केलेले शुल्क हे त्यांच्या नोटीस बोर्डवर व संकेत स्थळावर प्रदर्शित करावे तसेच शुल्क निश्चित होण्यापूर्वी ज्या विद्यार्थ्यांकडून जादा शुल्क घेतले असेल ते त्यांना परत करण्याबाबतची कार्यवाही करावी. महाविद्यालयांनी शुल्क व इतर माहिती त्यांच्या संकेतस्थळावर प्रदर्शित केल्याबाबत व संकेतस्थळाचे नाव समितीस खालील तक्त्यात सादर करावे.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नाव | संकेतस्थळाचा पत्ता | माहिती अपलोड केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| | | | |

(हरिविजय शिंदे)
सहसंचालक,
शिक्षण शुल्क समिती, मुंबई

प्रत माहितीस्तव सविनय सादर -
१.मा.अध्यक्ष, शिक्षण शुल्क समिती तथा मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई-३२
२.मा.सदस्य सचिव,शिक्षण शुल्क समिती, मुंबई तथा मा.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण पुणे.